# सविस्तर जाहिरात

## अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक ४२२००४
## सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवाकरार पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत, जाहिरातीचा सविस्तर तपशील

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५ /प्र. क्र.१००/१३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १७.१२.२०१६. अनुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गात सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने या कार्यालयामधील विवक्षीत कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

| अ.क्र. | संवर्ग | पद संख्या (अंदाजे) |
|---|---|---|
| १. | उपविभागीय अभियंता | ३ |

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्यासाठी किंवा एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी यांना जलसंपदा विभागीतील मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक अंतर्गत व्दारांची संकल्पन कामे इ. प्रकारचे कामाचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडे दि.१४/०३/२०२३ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यत) प्राप्त होईल याप्रमाणे पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकिटावर "सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे. उपरोक्त नमूद नियोजित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर सेवाकरार पध्दतीवर नेमणूकांचे आदेश हे योग्य स्तरावर अंतिम मान्यतेनंतर निर्गमीत करण्यात येतील.

**सेवा करार पध्दतीवर भरावयाच्या पदांचा व विवक्षित कामांचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ. क्र | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशील | जलसंपदा विभागातून खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | उपविभागीय अभियंता | जलसंपदा विभागांतर्गत अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक या कार्यालयांतर्गत संकल्पनाची कामे, धरणाच्या / सांडव्यावरील वक्राकार दरवाज्यांचे संकल्पन, बंधा-या वरील उभे उचल दरवाज्याचे संकल्पन, उच्चालक आधार संररचनेचे संकल्पन, सांडव्यावरील प्रस्तावित थोप दरवाज्यांचे संकल्पने इ. प्रकारचे कामाचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. | उपविभागीय अभियंता |

सदर नेमणूकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट https://wrd.maharashtra.gov.in चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक या कार्यालयात ही उपलब्ध आहे.

**सदर नेमणुक ही खालील सर्वसाधारण अटी व शर्तीच्या अधीन राहील.**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे, त्या पदाचे विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा जलसंपदा विभागातील संकल्पन कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणुक जास्तीत जास्त अकरा महिन्यासाठी किंवा एक वर्षासाठी राहील. अकरा महिन्यापेक्षा किंवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवा निवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५ /प्र. क्र.१००/१३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १७.१२.२०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच शासन निर्णया सोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार तसेच शासन निर्णयातील मुद्दा क्र.ड(१) मधील क, ख, व इ मधील उपमुद्दयानुसार व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.२१ फेब्रुवारी २०१८ नुसार मासिक परिश्रमिक म्हणून त्यांना वेतन अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/ संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.५००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेखात देण्यात यावा.

५. करार पध्दतीवर नियुक्ती करण्यात येणा-या (व्यक्ती) अधिकारी त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील.

६. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येण्यापूर्वी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक अधिकाऱ्याचे मूळ प्रमाणपत्र द्यावे.

७. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमणूक दिलेली कामे (विवक्षित कामे) पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील. करार पध्दतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, हया अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत, या बाबतचे बंधपत्र / हमीपत्र उमेदवारास रु.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक राहील.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. सदर अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात/व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

११. अशा अधिकारी/ कर्मचारी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळेच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१३. अशा करार पध्दतीवरील अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/ माहिती, कामाबाबत व आधार सामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१४. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१५. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडून प्रमाणित करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र/ नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यांत यावे.

१६. क्षेत्रिय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गीक अपघात व काही आजार उभ्दवल्यास कार्यालय/शासन बाधील राहणार नाही.

१७. अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांचे कुटुंब निवृत्तीवेतन मंजुरीचे मा.महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१८. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१९. मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांना सूचना ई-मेलव्दारे पाठविण्यांत येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाव्दारे कळविण्यांत येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व सद्यास्थितीत चालू असणारा भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यांत येईल व याबाबत संबंधिताना कळविण्यात येईल. तसेच अंतीम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ई-मेलवर कळविण्यांत येईल.

२०. सदर नियुक्ती अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक येथे विवक्षीत कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास सेवा करार पध्दतीने भरावयाची पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार अबाधित राहील.

२१. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांस कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

२२. उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन/ नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतिम राहतील.

२३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांस अनुज्ञेय होणा-या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणा-या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

२४. मुलाखतीस पात्र तसेच नामिकासूचीत निवड झाल्यास अंतिम नियुक्ती ग्राहय धरता येणार नाही. याबाबत सर्व अधिकार अधीक्षक अभियंता (दरवाजे) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक या कार्यालयाचे राहतील.

(प्र.रा.पाटील)
अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,
नाशिक

**जलसंपदा विभाग, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक**

**सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता (स्थापत्य) यांची करारपध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

जलसंपदा विभागातील विविध प्रकल्पांच्या व्दाराचे संकल्पन करणेसाठी, रेखाचित्र तयार करणे इत्यादी कामे कालमर्यादेत पुर्ण करण्यासाठी संकल्पन व रेखाचित्र कामाचा अनुवभ असलेल्या उपविभागीय अभियंता दर्जाच्या सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी यांची मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक अंतर्गत दरवाजे मंडळाकडे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक संकीर्ण ०१७/प्र.क्र./१००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६ याअन्वये व इतर अनुषंगीक शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती जलसंपदा विभागाचे संकेतस्थळ https://wrd.maharashtra.gov.in या वेब साईटच्या मुख पृष्ठावर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी संकेतस्थळावरील माहिती पाहून अर्ज करावेत.

सही

( प्र.रा.पाटील )

अधीक्षक अभियंता (दरवाजे)

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना

नाशिक

<u>विहीत नमुन्यातील अर्ज</u>

**जलसंपदा विभागांतर्गत अधीक्षक अभियंता (दरवाजे), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक ४२२००४ येथे सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त उप अभियंता यांची नेमणूक करण्यासाठीचा अर्ज**

**प्रति,**
**अधीक्षक अभियंता (दरवाजे),**
**मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,**
**नाशिक**

उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

अर्ज केलेल्या पदाचे नाव :-

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | कायमचा पत्ता | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) | |
| ४ | ई - मेल (अनिवार्य) | |
| ५ | सध्याचा पत्ता | |
| ६ | जन्मतारीख | |
| ७ | राष्ट्रीयत्व | |
| ८ | प्रवर्ग | |
| ९ | लिंग | |
| १० | अवगत भाषा | |
| ११ | शैक्षणिक माहिती | |

१२- अनुभव

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३- सेवानिवृत्तीचा दिनांक

१४- सद्य:स्थितीत कोठे काम करीत असल्यास तपशील

१५- प्रमाणपत्र

मला पूर्णपणे माहिती आहे की, विवक्षित सेवा/कामासाठी विषयनिहाय एमपॅनलमेंट व्दारे संकल्पनांच्या कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने उप अभियंता या पदाकरीता उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहिरातीत नमूद विवक्षीत कामासाठीच असून जास्तीत जास्त अकरा महिने/एक वर्षाच्या कालावधीसाठी आहे. कामाच्या निकडीनुसार अधीक्षक अभियंता (दरवाजे) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना,नाशिक येथे माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सूचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

अर्जदाराची नाव व सही

ठिकाण -

दिनांक -